# अटी व शर्ती :-

1.निविदा फक्त ई - निविदे व्दारे स्विकारल्या जातील.

2. ई - निविदा ही मॉडेल अंगणवाडी कार्यातील अनुभवी संस्था / कंपनी उत्पादक किंवा अधिकृत विक्रेते यांनी भरावीत व अधिकृत विक्रेते ई - निविदा भरत असतील तर त्यांच्या सोबत अधिकृत विक्रेते असलेबाबतचे प्रमाणपत्र स्कॅन करुन ई - निविदा सोबत जोडावे.

3. वरील कामाची संपुर्ण माहिती https://wcd.maharashtra.etenders.in या संकेत स्थळावर दिनांक 27.11.2018 सायं.17.00 वाजेपर्यंत ऑनलाईन पाहता येईल किंवा डाऊनलोड करुन घेता येईल. यात बदल करुन सदर कालावधी 7-12-2018 सायंकाळी 17.00 वाजेपर्यत वाढविण्यात आला आहे

4. ऑनलाईन ई - निविदा ही फक्त इलेक्ट्रॉनिक फॉरमेट(प्रपत्रात) https://wcd.maharashtra.etenders.in या संकेत स्थळावर प्रसारित झालेल्या अधिकृत फॉरमेट(प्रपत्रामध्येच) https://wcd.maharashtra.etenders.in या संकेत स्थळावर दिनांक 07.12.2018 सायं.17.00 वाजेपर्यंत ऑनलाईन सादर करावीत.

5.खरेदी करावयाच्या स्मार्ट अंगणवाडीसाठी साहित्याचे नमुना सादर केल्याशिवाय ई-निविदा उघडली जाणार नाही.

6. ई-निविदेसोबत खालील कागदपत्रे स्कॅन करुन (फोटो प्रति सह) जोडणे आवश्यक आहे. ई-निविदा ही उत्पादक किंवा अधिकृत विक्रेते धारक यांनी भरल्यास व सोबत अधिकृत विक्रेते असलेबाबतचे प्रमाणपत्र स्कॅन करुन ई-निविदा सोबत जोडावे.

A. शासकीय मंडळ / महामंडळ / उपक्रमांना तसेच सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम ,2006 अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सूक्ष्म व लघु उत्पादक उद्योहानन निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सुट देण्यात आली आहे. याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.

B. उत्पादक / अधिकृत विक्रेते/ उत्पादक कंपनीचे पुरवठादार यांनी काढलेले ई-निविदा किंमत (EMD) बयाणा रक्कम व निविदा फॉर्मची किंमत ऑनलाईन पध्दतीने गेटवे पेमेंट सिस्टीम व्दारे भरणे आवशक आहे व भरणा केल्याबाबतची पावती निविदेसोबत देणे बंधनकारक राहील.

C. अंगणवाडी केंद्रास स्मार्ट अंगणवाडीमध्ये रुपांतरण करण्यासाठी प्रत्येक अंगणवाडीमध्ये तपशीलवार नमुद सर्व साहित्य संच आवश्यक असल्याने सर्व बाबींचे दर देणे अनिवार्य आहे.

7. वरील अट क्र.6 (A,B) मधील वर्णनानुसार असलेली कागदपत्रे ई-निविदा सोबतच्या कागदपत्रामध्ये जोडलेली नसतील किंवा दिलेल्या वेळेमध्ये व दिनांकानुसार सादर न केल्यास संबंधीत ई-निविदा ही अपात्र (Invalid) ठरवण्यात येईल याची नोंद घ्यावी.

8.स्मार्ट अंगणवाडी कल्पनेचे संपुर्ण प्रस्तुतीकरण-

* ऑगमेंटेड रिॲलिटीसह इनोवेटिव व क्रिएटिव प्रस्तुतीकरण सक्तीचे.

9. ई-निविदे मध्ये नमुद केलेले सर्व साहित्य अंगणवाडी स्तरावर पुरवठा करावयाचे आहेत. त्यामुळे दिलेले दर हे कोणत्याही अटी व शर्ती विरहीत असावेत.

10.एक व्यक्ती किंवा संस्था निविदा प्रक्रियेत वाच्यार्थ्याने केवळ एकच निविदे व्दारे सहभागी होतील.

**11.भारतीय मानांकन संघटनेनुसार (आय एस ओ) 9001:2005, 9001:2008 आय एस ओ 14001:2015, आय एस ओ / आय ई सी 50:2014 ओ एच एस ए एस 18001:2007, बी आय एफ एम ए प्रतिनिधी गुणवत्ता आणि हरित द्रव्ये (ग्रीन मटेरियल) प्रमाणपत्रे सादर करावी लागतील.**

**12.निविदा भरताना पुरवठा धारकाने पुरवठा करावयाच्या वस्तुचे दर हे प्रती नग नमुद करावे व यामध्ये वस्तुची निव्वळ किंमत तसेच वस्तु सेवा कर व इतर वाहतुक खर्च स्वतंत्र दर्शविण्यात यावे.**

**13. सशर्त निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.**

**14. व्यापार तांत्रिक निविदेचे मुल्यांकन प्रथम करण्यांत येईल व त्यात पात्र ठरलेल्या निविदा धारकांचे व्यापारी दराचा लिफाफा (आर्थिक निविदा) उघडण्यात येईल व त्याचे मुल्यांकन करण्यात येईल. तांत्रिक बोली-आर्थिक बोलीचे प्रमाण 70:30 आहे.**

**15. व्यापारी तांत्रिक निविदेचे मुल्यांकन प्रथम करण्यांत येईल व त्यात पात्र ठरलेल्या निविदा धारकांचे व्यापारी दराचा लिफाफा (आर्थिक निविदा) उघडण्यांत येईल व त्याचे मुल्यांकन करण्यांत येईल.**

**16. या निविदेतीचा वैधता कालावधी 120 दिवसांचा राहील.**

**17. वरील साहित्यांची नग संख्या कमी -अधिक करण्याचे अधिकार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांना राहतील.**

**18 अ) लिफाफा क्र.1 : तांत्रिक लिफाफा, या लिफाफ्यात**

**I. 31 मार्च,2018 पर्यंतचे आयकर भरल्या संबंधीचे तथा थकबाकी नसल्याबाबतचे आयकर विभागाचे प्रमाणपत्र. किंवा याबाबत सुट असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.**

**II. वस्तू सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे निविदेसोबत मार्च,2018 अखेर पर्यंतचा वस्तु सेवा कर /Vat भरणा केलेले आहे असे विक्रीकर प्राधिकर-याने निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राचे साक्षांकित सत्यप्रत अथवा Vat / GST भरण्यापासून सुट मिळाली असल्यास तसे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र स्कॅन करुन सोबत जोडावे.**

**III. मागील तीन आर्थिक वर्षातील (2015-16, 2016-17, 2017-18) रु.1 कोटीची उलाढाल दर्शविणारे विवरण आणि आयकर परतावा दाखल केल्याचे व त्याचे भुगतान केल्याची प्रत व सनदी लेखाकार (सीए) चे प्रमाणपत्र.**

**IV. निविदा फी व बयाणा रक्कम भरणा केल्याचे Online Conformation पावती जोडावी.**

**V. स्वत: उत्पादक धारक असल्यास लघु उद्योगाकडे नोंदणी केल्याचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्राची प्रत जोडण्यांत यावी.**

**VI. निविदा धारक हा जर व्यापारी घटक असेल तर ज्या उत्पादकाच्या वस्तु करिता त्यांनी निविदा भरलेली आहे अशा उत्पादकाचे प्राधिकार पत्राची प्रत व दुकान नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.**

**VII. निविदे संदर्भातील सादर करण्यांत येणा-या साहित्याचा नमुना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे दिनांक 01 डिसेंबर,2016 मध्ये नमुद केलेल्या अधिकृत प्रयोगशाळेतून स्वखर्चाने तपासणी करुन तपासणी अहवाल सादर करावा. (तपासण्या योग्य किंवा ज्याची तपासणी करता येणे शक्य आहे अश्याच साहित्याची तपासणी आवश्यक आहे.)**

VIII. निविदाधारकांचा पुरवठयासंबंधीत कोणत्याही स्तरावर काळया यादीमध्ये समावेश नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडावे.

**IX. TAN /PAN कार्डची प्रत व मागील 3 वर्षाचे (2015-2016, 2016-2017, 2017-2018) निर्धारण कर वर्ष आयकर विवरणपत्र जोडण्यात यावे.**

**X.** सदर निविदेत भाग घेणे,निविदेची कागदपत्रे सादर करणे,बैठकीकरीता उपस्थित रहाणेकरीता प्रतिनिधीस प्राधिकृत केल्याचे पत्र (नमुना - 2) जोडण्यात यावे.

**Xi.** निविदाकारास निविदेतीत अटी व शर्ती मंजुर असल्याचे,काळया यादीत समाविष्ट नसल्याचे व इतर बाबी संदर्भात (संलंग्न नमुना -3) नुसार रु.100/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञा पत्र सादर करणे आवश्यक आहे.

**XII.** प्रत्येक निविदा धारक हा संबधीत वस्तुचा उत्पादक नसल्यास प्रत्येक वस्तुकरीता उत्पादकाकडुन अधिकृत विक्रेता म्हणून प्राधिकार दिल्याचे पत्र निविदेसोबत सादर करावे.

**XIII.** निविदा भरणा-यांच्या तर्फे जी व्यक्ती प्रशिक्षण देणार आहे, त्या व्यक्तीचे मॉंटेसरी ट्रेनिंग झाल्याचे प्रमाणपत्र.स्मार्ट अंगणवाडी तयार केल्याचा कामाचा अनुभव असल्याच्या आणि काम केल्याच्या प्रमाणपत्रांची प्रत असल्यास प्राधान्य

ब - लिफाफा क्रमांक 2 - व्यापारी दराचा लिफाफा (आर्थिक निविदा) (साहित्याचा दर विभागाने अपलोड केलेल्या निविदा प्रपत्रावर दर्शविण्यात यावेत)

निविदा भरताना पुरवठाधारकाने पुरवठा करावयाच्या वस्तुचे दर प्रति नग संख्या नमुद करावेत व यामध्ये वस्तुंची निव्वळ किंमत तसेच वस्तु व सेवा कर व वाहतुक खर्च स्वतंत्र दर्शविण्यात यावा . त्याचप्रमाणे या सर्व बाबी समाविष्ट केल्यानंतरचे एकूण दर दर्शविण्यात यावेत. अन्य कोणत्याही पृष्टावर लिहिलेले दर ग्राहय धरले जाणार नाही. तसेच दर्शविण्यात आलेले दर स्पष्ट असुन त्यात खाडाखोड केलेली नसावी.

19) काही न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास त्याचे क्षेत्र मर्यादा मुबंई उपनगर जिल्हा हे राहिल.(वेळोवेळी लागू होणारे नियम व कायदे आपोआप लागू होतील.)

20) पुरवठा आदेश मिळाल्यापासून विहित केलेल्या कालावधीत नमुन्यानुसार वस्तु पोहोच व स्मार्ट अंगणवाडीचे विहित काम पुर्ण करावे लागेल, अंगणवाडी केंद्राचे मॉडेल अंगणवाडीत (स्मार्ट अंगणवाडीत) रुपांतर केल्यानंतर अंगणवाडी सुशोभिकरणाचे स्पेसिफिकेशन प्रमाणे काम पुर्ण झाल्याची बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी मागणीप्रमाणे स्पेसिफिकेशन प्रमाणे साहित्य प्राप्त झाला व त्याची नोंद साठा नोंदवहीत मध्ये घेतली असल्याची पोहोच पावती (छांयाकित प्रत ग्राहय धरली जाणार नाही.),बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या स्वाक्षरीने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,मुबंई उपनगर जिल्हा यांना सादर केल्याशिवाय देयकाची रक्कम अदा करता येणार नाही.

**21) सदोष (उदा.फाटलेले,बिघाड असलेले,तुटलेले,भिजलेले,जळालेले,किंवा अपुर्ण साहित्य इत्यादी) 1 महिन्यात परिस्थितीनुरुप बदलुन देणे बंधनकारक राहिल.तसे न केल्यास पुरवठाधारकाचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करुन सदर साहित्याची रक्कम पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.आपणांस कायदेशीर नोटीस बजावून आपले नांव काळया यादीत टाकण्यासाठी शासनास शिफारस केली जाईल.**

**22) सदरच्या साहित्य  पुरवठयाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन 120 दिवसाच्या आत आदेशात नमुद केलेल्या अंगणवाडी स्तरावर पुरवठा करणे पुरवठाधारकास बंधनकारक राहिल. तसेच विशिष्ट परिस्थितीत पुरवठा कालावधीत वाढ करण्याचे (मुदतवाढ) अधिकार महिला व बाल विकास अधिकारी,मुबंई उपनगर यांना राहतील.**

**23)  SRA इमारतीमध्ये कार्यरत असणा-या अंगणवाडी केंद्राचे स्मार्ट अंगणवाडीमध्ये रुपांतर करावयाचे असल्यामुळे मूळ संरचनेमध्ये कुठल्याही बदलास अनुमती असणार नाही. तसेच अंगणवाडी  निहाय भिंतीचा आकार वेगवेगळा असल्यामुळे अतंर्गत सुशोभिकरणाचे व रंगकामाचे दर  Specification  व एकक परिमानानुसार निर्धारीत केले जाणार नाहीत.**

**24) निविदाकाराने अंगणवाडी सेविकांना साहित्य हाताळणी बाबतचे तसेच निविदेतील साहित्याशी संबंधीत पुर्व शालेय शिक्षणाबाबत प्रशिक्षण देवून प्रशिक्षणानंतर पुढील 1 वर्षामध्ये follow up साठी  तीन प्रशिक्षण सत्र घेणे अनिर्वाहय आहे.**

**25) स्मार्ट अंगणवाडीचे काम विहित वेळेत पूर्ण न झाल्यास साहित्याचा व सुशोभिकरणाच्या कामाच्या किंमतीवर 0.5% प्रति आठवडा याप्रमाणे दंड आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालील प्रमाणे राहिल. पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या साहित्याची   किंमत 1 लाखापेक्षा जास्त असेल तर अशा साहित्याच्या किंमतीच्या 5% दंड .**

**26) मंजुर केलेल्या नमुन्याप्रमाणे वस्तुंचा पुरवठा व स्मार्ट अंगणवाडीचे काम करण्यात यावे. अन्यथा वस्तु नाकारण्यात येईल.तसेच असे साहित्य स्वखर्चाने परत न्यावे लागेल.त्याकरीता कोणताही खर्च या कार्यालयाकडून दिला जाणार नाही. व साहित्य पुरवठा आदेश रदद करुन अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच करार उल्लंघनाबाबत कायदेशीर कारवाई केली जाईल.**

**27)कोणतेही कारण न दर्शविता एक किंवा सर्व निविदा रदद करण्याचे अधिकार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,मुबंई उपनगर यांनी राखून ठेवले आहे.**

**28) खरेदी करावयाचे साहित्य कमी अथवा अधिक होवू शकते. तसेच खरेदीसाठी ठरविण्यात आलेली  तरतुद कमी अथवा जास्त होवू शकेल.**

**29) सदर साहित्याचे दर बाजार दरापेक्षा जास्त आढळून आल्यास निविदा रदद करण्याचे अधिकार खरेदी समितीस राहिल.**

**30) निविदा मंजुर झाल्यास 3% सुरक्षा ठेव राष्टीय कृत बँकेच्या बँक गँरटी स्वरुपात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,मुबंई उपनगर यांचे नावे जमा करावी. खरेदी रकमेच्या प्रमाणे मुद्रांक शुल्क (स्टॅप शुल्क) (रु.500/- प्रमाणे ) भरुन करारनामा करुन दयावा लागेल. यानंतरच पुरवठा आदेश देण्यात येतील.**

**31) सदर साहित्य पुरवठाबाबत भविष्यात काही लेखा आक्षेप आल्यास त्यातील आक्षेपीत रक्कम पुरवठाधारकांकडून वसुल केली जाईल. व त्या वसुल पात्र रकमा भरणा करणे पुरवठा धारकांवर बंधनकारक राहिल.**

**32) साहित्याची एकूण किंमत विचारात घेवून ( निव्वळ किंमत,वस्तु व सेवा कर, व वाहतूक खर्च,समाविष्ट असलेले दर) विचारात घेवून L-1,L-2 निश्चित केले जातील.**

**33) निविदेत नमुद केलेल्या सर्व बाबींसाठी दर नमुद करणे आवश्यक आहे. एखादी बाबीसाठी दर नमुद न केल्यास अथवा दिलेल्या बाबी व्यतिरिक्त बाबींचे दर नमुद केल्यास निविदा परिपूर्ण नसल्याचे मानुन सदर निविदा अपात्र करण्यात येईल.**

**(शोभा शेलार)**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,**
**मुबंई उपनगर,चेंबुर**